## अमरावती महानगरपालिका, अमरावती
## दिनांक 21.6.2023 रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमाकं 93 -** महानगरपालिकेच्या शाळा मधील विद्यार्थ्या करीता योजना राबविण्या बाबत.

**ठराव क्रमाकं 93 -** उपरोक्त संदर्भिय नगर विकास विभागाचा शासन निर्णय प्राप्त आहे. सदर शासन निर्णयामध्ये मनपाच्या 5% रकमेमधुन राबविण्याच्या महिला व बालकल्याणासाठीच्या योजना निश्र्ची तीकरण व मार्गदर्शन सुचना असुन त्यानुसार योजना संबंधीत महानगरपालिका यांनी राबबावच्या आहेत. त्यामधील विवरणपत्र "अ" मध्ये महिलांकरीता आणि विवरणपत्र "ब" मध्ये बालकांकरीता नमुद योजना /कार्यक्रम /कामे राबविण्यास शासनाने मान्यता देण्यात आलेल्या आहेत. शासन निर्णयामधील विवरण "अ" मध्ये महिलांकरीता आणि विवरणपत्र "ब" मध्ये बालकांकरीता नमुद योजना/ कार्यक्रम/कामे राबविण्याकरीता रु.25 लक्ष प्रती योजना या आर्थिक मर्यादेपर्यत तसेच अतिरिक्त योजना राबविणे ,मान्यता देणे व योजना राबविण्याचे अधिकार मा. मनपा आयुक्त यांना आहे.तसेच सदर योजना/कार्यक्रम/कामे राबविण्याकरीताचे प्रशासकीय प्रस्तावास महिला बालकल्याण समितीची शिफारस घेवुन योजना राबवायच्या आहे.

संदर्भिय शासन निर्णयानुसार विषयांकीत योजना शिक्षण विभागाने खालील योजना प्रस्तावित केलेल्या असुन सदर योजना महिला व बालकल्याण करीता राखीव 5% निधीतुन राबवायच्या आहेत.

**योजना क्र.1** - मुलीकरीता शिष्यवृत्ती योजना

**योजना क्र.2** - मुलींचे शाळा गळतीचे प्रमाण थांबविण्यासाठी उपस्थिती भत्ता देणे.

**योजना क्र.3** - महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळामधील विदयार्थीनीना मोफत गणवेश देणे.

**योजना क्र.4** -महिला व बालके यांचेकरीता व्यायाम शाळा उभारणे

**योजना क्र.5** - बाल कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम

**योजना क्र.6** -शालेय मुले व मुली यांच्यासाठी विविध क्रीडा सुविधा निर्माण करणे.

**योजना क्र.7** - महिला व मुलींसाठी विविध कला स्पर्धाचे आयोजन करणे

**योजना क्र.8** - गुणवत्ता प्राप्त मुली/महिला खेळाडुकरीता शिष्यवृत्ती देणे.

**योजना क्र.9** - विज्ञान शोधिका

**योजना क्र.10** - संगणक वर्ग प्रकल्प

**योजना क्र.11** - मुली /महिलांना स्वरक्षणासाठी कराटे/योगा /मार्शल आर्ट प्रशिक्षण देणे

उपरोक्त प्रस्तावाची ठळक रुपरेषा शिक्षण विभागाने तयार केलेली आहे. परंतु योजना करीतांना अपेक्षीत खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्याकरीता योजनानिहीय सविस्तर प्रस्ताव तयार करणे आवश्यक आहे.त्यानुसार योजना अमंलबजावणी करीता करावयाची कार्यवाही (DBT/ निवीदा /दरपत्रक इ.)निश्र्चीत करता येईल. सदर योजना मनपा शाळेतील मुलांकरीता असल्याने प्रत्यक्ष लाभार्थी संख्या व इतर अनुषांगीक माहिती शिक्षण विभागाकडे असल्याने त्या योजनांचे नियोजन शिक्षण विभागाकडुन करणे प्रशासकीय दृष्टया उपयुक्त ठरेल. काही योजनांची प्रशासकीय कार्यवाही महिला व बालविकास विभागाकडुन करता येवु शकेल.

उपरोक्त 01 ते11 योजना राबविण्याबाबत मा.आयुक्त यांनी प्रशासकीय मंजुरी प्रदान केलेली आहे.शासन निर्णयानुसार सदर योजना राबविण्याकरीताचे प्रशासकीय प्रस्तावास महिला बालकल्याण समितीची शिफारस घेवुन योजना राबविण्याचे निर्देश आहे,परंतु संध्या महिला बालकल्याण समिती अस्तीत्वात नसल्याने सदर सदर्हु प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे. सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा./-**
**नगरसचिव**
**महानगरपालिका, अमरावती**

**स्वा./-**
**प्रशासक**
**महानगरपालिका, अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती